## निसर्गानुभव कार्यक्रमात सहभागी होणेसाठी अटी व शर्ती

1. निसर्गानुभव कार्यक्रमा अंतर्गत अभयारण्य क्षेत्रातील मचाणावर **दि. 16 मे, 2022 रोजी दुपारी 03.00 वाजता पासनु दुसऱ्या दिवशी दि. 17 मे, 2022 रोजी सकाळी 08.00 वाजता** पर्यंत बसता येईल.
2. प्रत्येक व्यक्तीस सहभागी होण्यासाठी स्वतंत्र ऑनलाईन बुकींग करावी लागेल.
3. निसर्गानुभव कार्यक्रमासाठी मचाणाचे वाटप विभागीय वन अधिकारी(वन्यजीव), बोर अभयारण्य, नागपूर या कार्यालयामार्फत करण्यात येईल.
4. निसर्गानुभव कार्यक्रमाकरिता **प्रति उमेदवार 2000 रुपये शुल्क** आकारले जाईल ज्यामध्ये त्यांना एक टी शर्ट आणि कॅप देखील दिली जाईल.
5. निसर्गानुभव कार्यक्रमाकरिता मचाण वर अन्न व पाणी पुरविले जाईल.
6. एका मचानावर फक्त 02 व्यक्तीला निसर्गानुभव कार्यक्रमासाठी बसता येईल.
7. मचानापर्यंत सहभागी होणाऱ्या व्यक्तींना त्याचे वाहन नेता येणार नाही.
8. सहभागी होणाऱ्या व्यक्तींना संरक्षीत क्षेत्राचे सर्व नियम बंधनकारक राहतील.
9. निसर्गानुभव कार्यक्रमाकरीता सहभागी होणाऱ्या व्यक्तींना आपल्या प्रकृतीबाबत काळजी स्वत: घ्यावी लागेल.
10. निसर्गानुभव कार्यक्रमाच्या काळात कोणत्याही प्रकारची दुर्घटना झाल्यास सर्वस्वी जबाबदारी ही सहभागी होणाऱ्या व्यक्तींची राहील.
11. सहभागी होणाऱ्या व्यक्तींचे कपडे निसर्गाशी समरस असावे.
12. कोणतेही कारण न देता मचान संख्या कमी करणे, कार्यक्रमाच्या वेळेमध्ये बदल करणे तसेच संपुर्ण निसर्गानुभव कार्यक्रम, 2022 रद्द करण्याचा अधिकार विभागीय वन अधिकारी(वन्यजीव), बोर अभयारण्य, नागपूर यांनी राखुन ठेवला आहे व त्यांचा निर्णय सर्व सहभागी होणाऱ्या व्यक्तींसाठी अंतिम व बंधनकारक राहील.

## निसर्गानुभव कार्यक्रमाच्या दरम्यान पाळावयाचे नियम

1. सद्यस्थितीत उन्हाळयाचे तापमान लक्षात घेता अनेक वन्यप्राणी हे दिवसातुन अनेकदा पाणी पिण्यासाठी पानवठयावर येतात. ही बाब लक्षात घेऊन सहभागी व्यक्तींनी काळजीपुर्वक नोंदी घ्याव्यात. एकाच प्राण्याची दोनदा नोंदी होणार नाही याची दक्षता घ्यावी.
2. निसर्गानुभव कार्यक्रमात मचानावर बसलेले असतांना जोरात बोलण्यास, मोबाईल फोन, फ्लॅश कॅमेरा, संगीत वाद्य, सर्च लाईट किंवा विजेरीचा वापर करण्यास व इत्यादी वस्तु ठेवण्यास सक्त मनाई आहे.
3. उग्रवास असलेले सुगंधीत द्रव्य कपड्यांवर लावु नये.
4. मचानावर जातांना सोबत मासाहारी भोजन, सिगारेट, बीडी, मद्य, तंबाखु जन्य पदार्थ व इतर आक्षेपार्ह वस्तु घेवुन जाण्यास पूर्णपणे बंदी आहे.
5. मचानावर असतांना भडक रंगाचे किंवा पांढरे शुभ्र कापड वापरु नये व निसर्गाशी एकरुप अशा रंगाचेच कपडे परिधान करावे.
6. मचानीवरील सहभागींनी परवानगी शिवाय खाली उतरु नये व पॉलीथीन बॅग व तत्सम साहित्य सोबत बाळगु नये.
7. सहभागी होणाऱ्या व्यक्तीस मचान निवडता येणार नाही व मचानात बदल करण्यात येणार नाही. त्याप्रमाणे एकदा मचानवर बसल्यावर निसर्गानुभव कार्यक्रम संपेपर्यंत परत येता येणार नाही. त्यांना दिलेला फार्म निसर्गानुभव कार्यक्रम पूर्ण होताच स्वाक्षरीसह परत करावा.
8. ठरवुन दिलेल्या मार्गाने / वाहनाने व ठरवुन दिलेल्या वेळीच आपल्याला निसर्गानुभव कार्यक्रमा स्थळी उपस्थित राहणे अनिवार्य आहे.
9. मचानावर बसल्यावर एकमेकांसोबत जोराने बोलु नये.
10. सोबत बसलेल्या वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी दिलेल्या निर्देशानुसार व वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 नुसार सर्व नियम बंधनकारक राहतील.
11. प्रवेश घेण्यापूर्वी सर्व सहभागी व्यक्तींची तपासणी कर्मचाऱ्यामार्फत केली जाईल. तपासणीमध्ये काहीही आक्षेपार्ह वस्तु आढळल्यास संबंधीताची नोंदणी रद्द होईल.
12. वरील नियमांचा भंग केल्यास संबंधीत सहभागी व्यक्तींवर वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 अन्वये कार्यवाही करण्यात येईल, याची दखल घ्यावी.

(पी. बी. पंचभाई)
विभागीय वन अधिकारी (वन्यजीव)
बोर अभयारण्य, नागपूर.